**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**रविवार दिनांक ०८ मार्च २०२६**

**ठळक बातम्या**

1. **आंतरराष्ट्रीय महिला दिन संपूर्ण राज्यात विविध उपक्रमांनी साजरा.**
2. **राज्यव्यापी एचपीव्ही लसीकरण मोहिमेचा आज प्रारंभ.**
3. **पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्थापनावर भर देण्यासाठी देशव्यापी 'जल महोत्सव २०२६' अभियानाला आजपासून सुरुवात.**

**आणि**

4. **टी-ट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेचा अंतिम सामना आज अहमदाबादमधे भारत आणि न्यूझीलंडमधे रंगणार.**

**आता सविस्तर बातम्या .......**

महिला दिवस-विदर्भ

आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त आज देशभरात विविध कार्यक्रम होत आहेत आहे . राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी महिला दिनानिमित्त देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. महिला या समाजाच्या आधारस्तंभ असून जर महिला सुशिक्षित, स्वावलंबी आणि सक्षम असतील तर त्या देशाला समृद्ध आणि प्रगतिशील बनवण्यासाठी मोठे योगदान देऊ शकतात असं त्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

***(होल्ड- बाईट- राष्ट्रपती - ३० सेकंद)***

आंतरराष्ट्रीय दिनानिमित्त केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयाने महिलांसाठी अस्मिता राष्ट्रव्यापी ऍथलेटिक्स लीग स्पर्धा आयोजित केली आहे. देशभरात खेलो इंडिया उपक्रमाअंतर्गत या अस्मिता लीग स्पर्धांचं आयोजन होत असून देशातल्या तळागाळातल्या महिला आणि मुलींना ऍथलेटिक्स स्पर्धांसाठी व्यासपीठ मिळवून देण्याचं या उपक्रमाचं उद्दिष्ट आहे. महाराष्ट्रात छत्रपती संभाजी नगर इथं आज केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या हस्ते महिलांसाठी विशेष, अस्मिता लीग स्पर्धांचं उद्घाटन झालं. तसेच महिलांसाठी वॉकेथॉन आणि सायकल स्पर्धांना त्यांनी हिरवा झेंडा दाखवला. अकोला आणि यवतमाळ मध्ये अस्मिता महिला लीग स्पर्धा आयोजित करण्यात आली. वयोगट 13 वर्ष, 13 ते 18 आणि 18 ते 29 या वयोगटातील युवतींकरिता 100 मिटर, 200 मिटर, 400 मिटर

दौड स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेमध्ये खेडाळू, शालेय तसेच महाविद्यालयातील युवतींनी सहभाग नोंदविला. नागपूर महानगरपालिकेतर्फे जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून स्त्री-शक्तीचा जागर आणि स्त्रीत्वाचा सन्मान करण्यासाठी यशवंत स्टेडियम इथं आयोजित 'पिंक मॅरेथॉन' स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सशक्त भविष्य आणि स्वतःच्या आरोग्यासाठी हजारोच्या संख्येत महिलांनी स्पर्धेत सहभाग घेत आरोग्याप्रति सजग राहण्याचा संदेश दिला. या मॅरेथॉन स्पर्धेच उद्घाटन समाजसेविका अमृता देवेंद्र फडणवीस यांनी केल तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महापौर निता ठाकरे होत्या. नागपुरात एनटीपीसी मौदा टाउनशिपच्या सेंट्रल पार्कमध्ये वॉकथॉन, झुंबा सत्र आणि केक-कटिंग समारंभाच आयोजन करून महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. त्याचप्रमाणे विदर्भ साहित्य संघ, साहित्य विहार, अभिव्यक्ती वैदर्भीय लेखिका संस्था आणि पद्मगंधा साहित्य प्रतिष्ठान या साहित्य संस्थांच्या संयुक्त विद्यमाने आज महिला दिनाच्या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं. विदर्भ साहित्य संघाच्या अमेय दालनात हा कार्यक्रम पार पडला. आज जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून गोंदिया शहरातील संडे सायकल ग्रुपच्या महिलांनी नऊवारी परिधान करत सायकल रॅलीत सहभाग घेतला. शहरभर भ्रमण करून आरोग्यदायी जीवनाचा संदेश यावेळी देण्यात आला -

***(होल्ड बाईट - महिला - १४ सेकंद)***

गोंदिया शहरात ‘सुपर वुमन ग्रुप’च्या वतीने बाईक रॅली काढत महिला सक्षमीकरणाचा संदेश देण्यात आला.

एचपीव्ही लसीकरण

राज्यशासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे १४ ते १५ वर्ष वयोगटातल्या मुलींसाठी ‘राज्यव्यापी एचपीव्ही लसीकरण’ मोहिमेचा प्रारंभ आज होत आहे. राज्यातील एकूण ९ लाख ८४ हजार ४१४ मुलींना या मोहिमेचा लाभ मिळणार असून लसीकरण पूर्णपणे मोफत आणि पालकांच्या संमतीने ऐच्छिक स्वरूपात होणार आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये, जिल्हा रुग्णालये, महानगरपालिका रुग्णालये आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रशिक्षित वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत लसीकरण केलं जाईल. सर्व लाभार्थ्यांची नोंदणी आणि प्रमाणपत्र वितरण केंद्र शासनाच्या U-WIN या डिजिटल पोर्टलद्वारे करण्यात येणार आहे.

जल महोत्सव

केंद्रीय जल शक्ती मंत्रालयाच्या पेयजल व स्वच्छता विभागातर्फे 'जल महोत्सव 2026' हे देशव्यापी अभियान 8 मार्च ते 22 मार्च या कालावधीत राबविण्यात येणार आहे. ग्रामीण पाणीपुरवठा सेवा वितरणात जनभागीदारी आणि समुदायाचे मालकी हक्क अधिक बळकट करण्यासाठी हे अभियान जल जीवन मिशन अंतर्गत राबविण्यात येणार आहे. 'जल महोत्सव' हा देशव्यापी जनआंदोलन म्हणून संकल्पित करण्यात आला असून या उपक्रमात ग्रामपंचायती, ग्राम स्तरावरील पाणी व स्वच्छता समित्या , स्वयं-सहाय्यता गट, युवक स्वयंसेवक, शैक्षणिक संस्था तसेच स्थानिक समुदाय सहभागी होऊन 'सुजल ग्राम' या संकल्पनेची पूर्तता करण्यासाठी पिण्याच्या पाण्याच्या योग्य व्यवस्थापनाला चालना देणार आहेत. 'जल महोत्सवांतर्गत बुधवार दिनांक 11 मार्च रोजी नवी दिल्ली येथील विज्ञान भवनात जल जीवन मिशन अंतर्गत ग्रामीण पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्थापनाला बळकटी देणाऱ्या तसेच नळाद्वारे पाणीपुरवठा प्रणालीचे शाश्वत व्यवस्थापन सुनिश्चित करण्यासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या तळागाळातील उत्कृष्ट नेतृत्वाचा राष्ट्रपतींच्या हस्ते सन्मान करण्यात येणार आहे. अमरावती जिल्ह्यात देखील जल महोत्सवाच्या निमित्ताने गावांमध्ये पाणी समित्यांच्या माध्यमातून प्रत्यक्ष कृतीवर भर दिला जाणार असून, प्रशिक्षित महिलांच्या साहाय्याने फिल्ड टेस्टिंग किटद्वारे पाण्याच्या गुणवत्तेची तपासणी केली जाईल.

वेटेरेन्स सन्मान रॅली

भारतीय सैन्याच्या वतीने मुख्यालय उत्तर महाराष्ट्र आणि गुजरात सब एरिया यांच्या मार्गदर्शनाखाली आज कविवर्य सुरेश भट सभागृहात, 'व्हेटरन्स सन्मान संपर्क रॅली' आयोजित करण्यात आली. या रॅलीमध्ये नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, अमरावती आणि वर्धा जिल्ह्यातील माजी सैनिक सहभागी झाले. माजी सैनिकांच्या तक्रारी जाणून घेणे तसेच सैन्य दल आणि केंद्र-राज्य शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती देणे हा या उपक्रमाचा उद्देश होता.

पश्चिम आशिया

पश्चिम आशियामध्ये युद्ध सुरू झाल्यानंतर आखाती प्रदेशातून आतापर्यंत ५२ हजारापेक्षा जास्त भारतीय नागरिकांना सुरक्षितपणे मायदेशी परत आणल्याचं परराष्ट्र मंत्रालयानं म्हटलं आहे. आखाती देशांमधलं हवाई क्षेत्र अंशतः खुलं करण्यात आल्यामुळे येत्या काही दिवसांमध्ये विमानाच्या आणखी फेऱ्या पाठवून सर्व भारतीय नागरिकांना सुरक्षितपणे मायदेशी आणलं जाईल. पश्चिम आशियातल्या संघर्षग्रस्त परिस्थितीमुळे दिल्ली आणि मुंबई इथल्या विमानतळांवर आज १०० पेक्षा जास्त

आंतरराष्ट्रीय विमान उड्डाणं रद्द करण्यात आली. त्यामुळे पश्चिम आशियातल्या काही देशांमध्ये जाणाऱ्या आंतरराष्ट्रीय विमान सेवांच्या वेळापत्रकात बदल होऊ शकतो, याची प्रवाशांनी नोंद घ्यावी असं विमानतळ प्राधिकरणानं म्हटलं आहे. दरम्यान सीबीएसईने या प्रदेशात येत्या ९, १० आणि ११ मार्च रोजी होणाऱ्या बारावीच्या परीक्षा पुढे ढकलल्या आहेत. विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेच्या संपर्कात रहावं आणि अधिकृत घोषणांचं पालन करावं असं याबाबतच्या निवेदनात यात म्हटलं आहे.

कच्च तेल

भारताला ऊर्जेचा पुरेसा पुरवठा होत असून, कच्चं तेल, एलपीजी अथवा एलएनजीचा कोणताही तुटवडा नसल्याचं केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीपसिंग पुरी यांनी म्हटलं आहे. दिवसातून दोनदा देशाच्या ऊर्जा परिस्थितीचा आढावा घेतला जात असून, आयातीचे विविध स्रोत वापरले जात आहेत, आणि त्यामुळे देशाची ऊर्जेची गरज भागेल, असं त्यांनी म्हटलं आहे.

समृद्धी महामार्ग

हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गावर बुलढाणा, जालना आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात आजपासून २७ मार्च पर्यंत  महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत गॅन्ट्री उभारण्याचे काम १५ टप्प्यात प्रस्तावित आहे. या दरम्यान प्रत्येक संबधित वाहिनीवरील वाहतूक ४५ ते ६० मिनिटांच्या कालावधीसाठी पूर्ण थांबविण्यात येणार आहे.

बेकायदेशीर कर्ज

अवैधरित्या कर्ज देऊन  मूळ रकमेपेक्षा जास्त रक्कम वसूल करणाऱ्या सावकार दाम्पत्यांविरुद्ध पोलिसांनी गुन्हा नोंदविला आहे. हा प्रकार भंडारा जिल्ह्यातील पवनी इथं उघडकीस आला. या प्रकरणात  ३ लाख ५० हजार रुपयांच्या कर्जाच्या बदल्यात १० टक्के व्याजाने एकूण १३ लाख ८० हजार रुपये वसूल करण्यात आले होते. पवनी पोलिसांनी या प्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या कलम १५२ आणि ३५१ (२) आणि महाराष्ट्र सावकारी कायदा २०१४ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

लक्ष्य सेन

भारताच्या लक्ष्य सेनने ऑल इंग्लंड ओपन बॅडमिंटन स्पर्धेत पुरुष एकेरीच्या अंतिम फेरीत धडक मारली आहे. त्याचा सामना आज सायंकाळी चीनी तैपेईच्या लीन चून ई सोबत होईल. काल झालेल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात लक्ष्यने कॅनडाच्या व्हिक्टर लाय याचा २१-१६, १८-२१, २१-१५ असा पराभव केला.

क्रिकेट

टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक विजेतेपदासाठी, भारत विरुद्ध न्यूझीलंड हा अंतिम सामना आज अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडीयमवर रंगणार आहे. सामना संध्याकाळी ७ वाजता सुरू होईल. टी-ट्वेंटी विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत खेळण्याची भारताची ही चौथी वेळ आहे. तर न्यूझीलंड संघ दुसऱ्यांदा अंतिम फेरीत पोहोचला आहे.

हवामान

नागपुरात आज 37 पूर्णांक चार दशांश सेल्सिअस इतकं कमाल तापमान नोंदवण्यात आलं आहे. तर मागील 24 तासात अकोला इथ सर्वाधिक 40 पूर्णांक आठ दशांश अंश तापमानाची नोंद करण्यात आली. याशिवाय वर्धा इथं 40, अमरावती इथं 40.6 तर वाशिम इथं 39.2. इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली. चंद्रपूर, गडचिरोली आणि यवतमाळ येथील तापमान देखील 38 अंश सेल्सिअस पेक्षा अधिक नोंदवण्यात आल आहे.

*****